महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०१७

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

शासकीय आश्रमशाळा मुसळवाडी (ता.मालेगाव, जि.वाशिम)येथील आश्रमशाळा संकुलाच्या बांधकामास मान्यता देणेबाबत

(१) ४२८१ (२२-१२-२०१४). श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळा, मुसळवाडी ता.मालेगाव येथील आश्रमशाळेची जुनी इमारत जिर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी नविन आश्रमशाळा संकुलाचा प्रस्ताव शासनांकडे मंजूरीसाठी गत २ वर्षापासुन प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन लोकप्रतिनीधीने नविन आश्रमशाळा संकुल बांधकामाच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत दिनांक २१ ऑगस्ट, २०१३ च्या दरम्यान विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, याबाबत विलंबाची कारणे काय, याबाबत शासनाची भूमिका काय ?

श्री. विष्णु सवरा (२०-०६-२०१७) :(१) व (२) अशंत: खरे आहे.

शासकीय आश्रमशाळा, मुसळवाडी ता. मालेगाव, जि.वाशिम करिता टप्पा-१ ची इमारत पुर्ण असून त्याच बरोबर पत्राच्या शेडचेही बांधकाम झालेले आहे. सद्यस्थितीत पत्र्याचे शेड जीर्ण झाल्यामुळे वापरात नाही. मात्र टप्पा - १ च्या बांधकाम सुस्थितीत, चांगले व वापरायोग्य आहे. त्यामुळे सद्यस्थितीत शाळा सदर ठिकाणी सुरु आहे.

शासकीय आश्रमशाळा, मुसळवाडी, ता.मालेगांव येथील आश्रमशाळा संकूल बांधकामाचे अंदाजपत्रके व आराखडे सुधारित करुन चालू दरसूचीनूसार मागविण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही.

मुसळवाडी (ता.मालेगाव, जि. वाशिम) येथे नवीन शासकीय आश्रमशाळा संकुलास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दि. २१ ऑगस्ट, २०१३ रोजीचे निवेदन शासनाकडे प्राप्त झालेले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उद्योजकांना संपादित केलेल्या भूखंडाबाबत

(२) ५२१४ (०९-०४-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने संपादित केलेल्या भूखंडापैकी ७८ हजार ९४७ एकर भूखंड उद्योजकांना अल्पदरात दिले, परंतू उद्योजकांनी केलेली फसवणूक आणि कारवाई करण्याबाबत शासनाची उदासीनतामुळे १९ हजार ८८० एकर जमिनीवरील तब्बल १३ हजार उद्योग सुरु होऊ शकलेले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियोजित कालखंडात उद्योग सुरु न झाल्यास भूखंड परत घेण्याची कारवाई एम.आय.डी.सी करते, मात्र अर्धवट कारखाने व बंद पडलेल्या कंपन्यांच्या जमिनी परत घेण्याची तरतूद एमआयडीसीच्या कायद्यात नसल्यामुळे तब्बल १९ हजार ८८० एकर भूखंड उद्योजकांकडे अडकून पडले आहेत हे खरे आहे काय,

(३) राज्यशासनाचा उपक्रम असलेल्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उद्योगासाठी राज्यातील काही कंपन्यांना दिलेल्या जागांवरती ५ वर्षाच्या आत उद्योग उभा न केल्याने हजारो कंपन्यांकडून दिलेल्या जमिनी परत मागितल्याचे माहे जानेवारी, २०१५ वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) राज्यातील औद्योगिक वसाहतीमध्ये अनेक व्यक्तींनी भूखंड घेतले असून आणखी असे भूखंड विनावापर पडून असल्याचे व असे भूखंड परत घेण्यात येणार असल्याची घोषणा राज्याच्या उद्योगमंत्र्यांनी नुकतेच केलेली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय, किती भूखंड विनावापर आहेत व किती भूखंड शासनाने परत घेतले आहेत व किती भूखंड परत घ्यायचे बाकी आहेत, असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली व करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) हे खरे नाही.

महामंडळाने ३१५७७.२९ हे. आर औद्योगिक क्षेत्राचे ४९४७० उद्योजकांना वाटप केले असून त्यापैकी, २३६२५.३० हे.आर क्षेत्रावर ३६४१४ उद्योग सुरु आहेत.विहीत कालावधीत उद्योग सुरु न करणाऱ्या ४०५३ भूखंडधारकांपैकी ३७३५ उद्योजकांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून ११२६ भूखंड महामंडळाने ताब्यात घेतले आहेत.उर्वरित भूखंडधारकांना नोटीसा देऊन भूखंड ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) व (३) भूखंड विकासाची कार्यवाही करारनाम्यात नमूद केलेल्या कालावधीमध्ये न केल्यास किंवा भूखंड विनावापर बराच काळ पडून असल्यास भूखंडधारकांना नोटीसा देऊन भूखंड ताब्यात घेण्याची कार्यवाही महामंडळ करते. ही प्रक्रिया सातत्याने चालणारी आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) विहीत कालावधीत उद्योग सुरु न करणाऱ्या ४०५३ भूखंडधारकांपैकी ११२६ भूखंड महामंडळाने ताब्यात घेतले असून उर्वरित २९२७ भूखंड नोटीसा देऊन ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच महामंडळाने उद्योग उभारणीसाठी लागणाऱ्या परवानग्यांची संख्या १४ वरुन ५ करण्यासंदर्भात कालबध्द कार्यक्रम आखून परवानग्या एकत्रित करणे व अनावश्यक परवानग्या रद्द करण्याची कार्यवाही सुरु केलेली आहे.

नगरसह राज्यातील अनेक जिल्ह्यातील समाजकल्याण विभागातील अनुसूचित जाती-जमाती व भटक्या विमुक्त विद्यार्थ्यांचे वसतिगृहाचे अनुदान व कर्मचाऱ्यांचे वेतन थकले असल्याबाबत

(३) ९२२१ (०९-०४-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरसह राज्यातील अनेक जिल्ह्यातील समाजकल्याण विभागातील अनुसूचित जाती-जमाती व भटक्या विमुक्त विद्यार्थ्यांचे वसतिगृहाचे अनुदान व कर्मचाऱ्यांचे वेतन थकले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुढील वर्षातील अंदाजपत्रकात अनुदानाची तरतूद नसल्याची बाब आढळून आली असून अनुदान व वेतनही मिळणार नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुदान व अंदाजपत्रकातील तरतूद करण्यात समाजकल्याण विभागातील प्रशासनाचा निष्काळजीपणा कारणीभूत ठरत असल्याने विद्यार्थी व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली, हे खरे आहे काय,

(४) त्यामुळे विद्यार्थी व कर्मचा-यांवर उसनवारीचे दिवस आल्याने वसतिगृहातून मिळणा-या विद्यार्थ्यांच्या जेवणाचा दर्जा चांगला नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (१९-०६-२०१७) :(१) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात मागणीपेक्षा कमी निधी उपलब्ध झाल्याने अनुदानित वसतिगृहांना देय परिरक्षण अनुदानाच्या ४९ टक्के अनुदान वितरीत करण्यात आले आहे. तसेच कर्मचारी मानधन माहे फेब्रुवारी, २०१५ पर्यंत अदा करण्यात आलेले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उद्योगासाठी संपादित केलेल्या जमिनीच्या मोबदल्यात प्रकल्पग्रस्तांना नोकरीत समाविष्ट करुन घेण्याबाबत

(४) ९२५३ (१०-०४-२०१५). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उद्योग धंद्यासाठी संपादित केलेल्या जमिनीच्या मोबदल्यात भूमिहिन होणाऱ्या शेतकरी व ग्रामस्थांना उभारण्यात येणाऱ्या उद्योगधंद्यातून प्रकल्पग्रस्त म्हणून नोकरीत समाविष्ट करुन घेण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आतापर्यंत एमआयडीसीने किती प्रकल्पग्रस्तांना उद्योगधंदयातील नोकऱ्यांमध्ये समावून घेतले आहे काय,
(३) असल्यास, विशेषत: चाकण (ता.खेड, जि.पुणे) येथील एमआयडीसी उभारण्यासाठी ज्यांच्या जमिनी संपादित केल्या त्या प्रकल्पग्रस्तांना किती नोकऱ्या दिल्या आहेत वा त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) व (२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रात ज्या उद्योजकाना भूखंडाचे वाटप करण्यात येते त्यावेळी करावयाच्या प्राथमिक करारनामामध्ये प्रकल्पग्रस्तांना प्राधान्याने नोकरीत सामावून घेण्याची अट नमूद करण्यात येते व प्रकल्पग्रस्ताना त्यांची पात्रता व गुणवत्तेनुसार नोकरीमध्ये सामावून घेण्याबाबत महामंडळामार्फत शिफारस करण्यात येते.

(३) चाकण औद्योगिक क्षेत्रासाठी १०३९८ जमिन मालकांच्या जमिनी संपादन करण्यात आल्या त्यातील महामंडळाच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या अर्जांमधील ८६ प्रकल्पग्रस्तांच्या/ कुटुंबाच्या अर्जानुसार त्यांना नोकरीमध्ये प्राधान्य देण्याबाबत उद्योजकांना शिफारस करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत चाकण औद्योगिक क्षेत्रातील मे.ब्रिजस्टोन कंपनीने ८८३+१२ व मे.व्होल्क्स वॅगन कंपनीने १४७ अशा एकूण १०४२ स्थानिक लोकांना नोकरीत सामावून घेण्यात आले आहे. तसेच महामंडळास प्रकल्पग्रस्त किंवा त्यांच्या कुटुंबियांकडून नोकरीकरिता १४२ अर्ज प्राप्त झाले असून ते संबंधित उद्योजकांकडे शिफारस करुन पाठविण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळात नियमाचे उल्लंघन करुन कर्मचारी भरती व लाभार्थींना कर्ज वाटप करण्यात आल्याबाबत

(५) ११४२६ (०९-०४-२०१५). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मातंग समाजाच्या उन्नतीसाठी स्थापन करण्यात आलेल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळात नियमाचे उल्लंघन करुन कर्मचारी भरती व लाभार्थींना कर्ज वाटप करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामंडळाचे माजी चेअरमन, महाव्यवस्थापक, प्रकल्प अधिकारी यांच्या संगनमताने उक्त महामंडळात गैरव्यवहार झाले असल्याचे तसेच माजी चेअरमन यांनी महामंडळाची जागा बळकावले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (१९-०६-२०१७) : (१), (२), (३) व (४) होय.

मात्र सन २०१०-११ ते २०१४-१५ या कालावधीतील महामंडळाच्या सर्व व्यवहाराची विभागीय व सीआयडी चौकशी सुरु आहे.

राज्यातील मातंग समाजासाठी वेगळे आरक्षण मिळण्याबाबत

(६) ११७१४ (०९-०४-२०१५). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मातंग समाजासाठी अ, ब, क, ड असे करून वेगळे आरक्षण मिळण्यासाठी मातंग शक्ती या सामाजिक संघटनेतर्फे अनेक वर्षापासून मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (१९-०६-२०१७) : (१) व (२) सदरचे निवेदन कार्यासनातील अभिलेखात आढळून आले नाही.
तथापि, मातंग समाजाचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकास होण्याचे दृष्टीने शासनाने क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोग स्थापन करण्यात आला होता. या विभागाच्या दि. ३१/१२/२०११ च्या शासन निर्णयान्वये क्रांतिवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाने शासनास सादर केलेल्या एकूण ८२ शिफारशींपैकी ६८ शिफारशी तत्वत: मान्य करण्यात आल्या असून त्याबाबत विविध विभागांकडून अंमलबजावणी करण्यात येत आहे. आरक्षणविषयक शिफारशीसह उर्वरित १४ शिफारशी अमान्य करण्यात आल्या आहेत.

मातंग समाजाचा अनुसूचित जाती या प्रवर्गात समावेश आहे. घटनेच्या ३४१ कलमानुसार अनुसूचित जातीच्या यादीत फेरबदल करण्याचे अधिकार केवळ केंद्र शासनास आहेत, राज्य शासनास त्यात कोणताही हस्तक्षेप करता येत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

भामरागड तालुक्यातील (जि. गडचिरोली) आदिवासी नागरिकांच्या मागण्यांबाबत

(७) १८३५४ (३१-०७-२०१५). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भामरागड तालुक्यातील (जि. गडचिरोली) आदिवासी नागरिकांनी त्यांच्या मागण्यांसाठी दिनांक २५ एप्रिल २०१५ ते १ मे, २०१५ या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आंदोलनकर्त्यांच्या मागण्या कोणत्या आहेत, तसेच त्यापैकी कोणत्या मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत,
(३) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (२४-०५-२०१७) : (१) हे खरे नाही.

दि.२५ एप्रिल, २०१५ ते दि.१ मे, २०१५ या कालावधीत भामरागड तालुक्यातील आदिवासी नागरिकांनी जिल्हाधिकारी, गडचिरोली कार्यालयावर आंदोलन केलेले नाही. तसेच सदर कालावधीत त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे मागण्यासंदर्भातील निवेदन जिल्हाधिकारी, गडचिरोली कार्यालयास प्राप्त झालेले नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

कुरकुंभ (ता. दौंड जि. पुणे) औद्योगिक वसाहतीतील कारगिल या कंपनीच्या साठवणुकीच्या बगॅसला आग लागल्याबाबत

(८) २४३२८ (३१-०७-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरकुंभ औद्योगिक (ता. दौंड जि. पुणे) वसाहतीतील कारगिल या कंपनीच्या साठवणुकीच्या बगॅसला आग लागल्याची घटना दिनांक ५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यस, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुषंगाने काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

कुरकुंभ औद्योगिक क्षेत्राच्या बाहेरील मे.कारगिल कंपनीने बगॅस डेपो साठवणूक केलेल्या जागेला दिनांक ५/५/२०१५ रोजी दुपारी १५ वाजून १५ मिनीटानी आग लागली होती. मे.कारगिल कंपनीतर्फे आगीची वर्दी मिळताच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अग्निशमन केंद्रातील अधिकारी व कर्मचारी यांनी अग्निवाहनासह घटनास्थळी जाऊन आग आटोक्यात आणली.

तसेच घटनास्थळी कोणीही व्यक्ती जखमी अथवा मृत झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

रामटेक तालुक्यातील (जि.नागपूर) आदिवासी बांधवांना मालकी हक्काचे पट्टे देण्याबाबत

(९) २६२२५ (३१-०७-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक तालुक्यातील (जि.नागपूर) गावांमध्ये आदिवासी बांधव झोपडपट्टयांमध्ये राहत असून त्यांना मालकी हक्काचे पट्टे देऊन घरे बांधण्यासाठी आर्थिक मदत देण्याची मागणी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (२४-०५-२०१७) :(१) व (२) अंशत: खरे आहे.

गावठाणातील अतिक्रमित भुखंड किंवा वाटपास शिल्लक असलेल्या भुखंडाची मागणी, जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडे घरे बांधण्याकरिता करण्यात येते. त्यानुसार रामटेक तालुक्यातील (जि.नागपूर) विविध गावांमध्ये आबादी गावठानांअंतर्गत जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडून मालकी हक्काचे आबादी भूखंड वाटप करण्यात येतात. मात्र, मालकी हक्काचे भूखंड वाटपानंतर घरे बांधण्याकरिता जिल्हाधिकाऱ्यांमार्फत आर्थिक मदत देण्यात येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पंढरपुरातील तिरंगा चौक ते सिएट रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(१०) २६४६९ (११-०८-२०१५). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळूज औद्योगिक क्षेत्रात जाणारा पंढरपुरातील तिरंगा चौक ते सिएट रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम रवासा कंपनीच्या चालढकलीमुळे गेल्या महिन्याभरापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या रस्त्यावरील वाहतूकीचा रोख पाहता या रस्त्यांचे काम पूर्ण करण्याकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच या रस्त्यांचे काम रखडवणा-या कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) खरे नाही.

(२) मे. रवासा कंस्ट्रक्शन कंपनी, मुंबई यांना रस्त्याचे डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्यासंबंधी वारंवार विनंती करुनही त्यानी काम पूर्ण न केल्यामुळे करारनाम्यातील बाब क्र.३(C) नुसार त्यांच्याकडून काम काढून घेऊन निविदा पुन:श्च मागवून कंत्राटदार मे.बी.पी.सांगळे कन्स्ट्रक्शन कंपनी ,नाशिक यांच्याकडे काम सोपविण्यात आले व त्यानी विहीत केलेल्या ९ महिन्याच्या कालावधीत म्हणजे दिनांक १३/५/२०१६ रोजी सदर काम पूर्ण केले आहे.

(३) मे. रवासा कंस्ट्रक्शन कंपनी यांनी काम विहीत वेळेत पूर्ण न केल्यामुळे त्यांचे नांव महामंडळाच्या काळ्या यादीत समाविष्ट करण्याची कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. तथापि मे.रवासा कंस्ट्रक्शन कंपनी यांनी त्यांचे काम काढून घेतल्याबाबत मा.दिवाणी न्यायालय, वरिष्ठ डिव्हीजन, औरंगाबाद येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाविरुध्द दावा दाखल केला असून तो न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदनगर येथील नागपूर औद्योगिक वसाहतीत अतिक्रमण करण्यात आल्याबाबत

(११) २९८८९ (२२-१२-२०१५). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर येथील नागपूर औद्योगिक वसाहतीमध्ये अतिक्रमण केल्याने या परिसरात सतत वाहतुकीची कोंडी होत असल्यामुळे अतिक्रमण हटविण्याची मागणी उद्योजक करत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर अतिक्रमण हटविण्याच्या जिल्हाधिकारी यांच्या आदेशाचे पालन झाले नसल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी असलेली अतिक्रमणे हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
महामंडळाने अतिक्रमण हटविण्याकरीता पोलीस निरिक्षक एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, अहमदनगर यांना पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली होती, परंतु काही तांत्रिक अडचणींमुळे उदा. ग्रामपंचायतीच्या निवडणुका, सण इ. कारणांमुळे पोलीस बंदोबस्त उपलब्ध होऊ शकला नव्हता. तथापि दिनांक ०५/११/२०१५ रोजी पोलिस बंदोबस्त उपलब्ध झाल्यामुळे सदर औद्योगिक क्षेत्रातील अतिक्रमण काढण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ग्रुप ग्रामपंचायत चाणजे (ता. उरण, जि. रायगड) येथील काळाधोंडा कोटनाका वस्तीची दलित वस्ती म्हणून नोंद करण्याबाबत

(१२) ४०३५९ (०४-०५-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रुप ग्रामपंचायत चाणजे (ता. उरण, जि. रायगड) येथील काळाधोंडा कोटनाका येथील वस्तीची दलित वस्ती म्हणून नोंद करणेबाबत मा. ग्रामविकास मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० जुलै,२०१५ रोजीच्या सुमारास निवेदन देऊनही अद्याप या संदर्भात कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (१२-०६-२०१७) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) तथापि अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तींचा बृहत आराखडा तयार करण्यासाठी अनुसूचित जाती व नवर्बाध्द घटकांच्या वस्तींचे सर्वेक्षणाचे काम सुरु आहे. सदर सर्वेक्षणानंतर ग्रुप ग्रामपंचायत चाणजे (ता.उरण, जि.रायगड) येथील काळाघोंडा कोटनाका वस्तीचा समावेश अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीमध्ये करण्याबाबतची कार्यवाही जिल्हा परिषद, समाजकल्याण अधिकारी, रायगड यांचे स्तरावरुन करण्यात येईल.

मराठवाड्यात टेक्सटाईल पार्क सुरु करणेबाबत

(१३) ४२५१७ (२७-०४-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.अजित पवार (बारामती), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ११ टेक्सटाईल्स पार्क उभारण्यात येणार असून विदर्भात ६ व मराठवाड्यात ५ असतील अशी घोषणा मा. मुख्यमंत्री यांनी माहे जानेवारी, २०१६ च्या तिसऱ्या आठवडयात वा त्यासुमारास केली आहे हे खरे काय

(२) असल्यास, हे पाच टेक्सटाईल पार्क कोणत्या जिल्हयात वा तालुक्यात उभारणार आहे,याबाबत किती खर्च येणार आहे तसेच केव्हापासून सुरु करण्यात येणार व किती जणांना रोजगार मिळणार आहे,

(३) असल्यास, कापसापासून कापडापर्यंतचा उद्योग एकाच ठिकाणी सुरु करण्यात येणार आहे हे ही खरे काय,

(४) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) व (२) शासनाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे नांदगाव पेठ (जि.अमरावती), अतिरिक्त यवतमाळ (जि. यवतमाळ), चिखली (जि. बुलढाणा), माजलगांव (जि. बीड), कृष्णूर (जि. नांदेड), मालेगांव (जि. नाशिक), भालेर (जि. नंदुरबार), कन्नड (जि. औरंगाबाद), जामनेर (जि. जळगांव), सेलू (जि. परभणी) अशा १० ठिकाणी टेक्सटाईल पार्क उभारण्याचा निर्णय घेतला असून त्या अनुषंगाने भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे. तसेच सदर टेक्सटाईल पार्कसाठी महामंडळाकडून जमिनी उपलब्ध करुन देण्यात येणार असून आवश्यकतेनुसार या ठिकाणी सी.ई.टी.पी. ची सुविधा तसेच रस्ते, पाणी व वीज व इतर पायाभूत सुविधा पुरविण्यात येणार आहेत.

(३) ज्या ठिकाणी कापसाचे उत्पादन जास्त प्रमाणात होत आहे त्या ठिकाणी टेक्सटाईल पार्क सुरु करण्याचे शासनाचे धोरण आहे.

(४) महामंडळाकडून भुसंपादनाची कार्यवाही सुरु असून त्या ठिकाणी रस्ते, पथदिवे व जल वितरिका यासारखी पायाभूत सुविधा तसेच विकासाची कामे महामंडळाकडून हाती घेण्यात आली आहेत. तसेच ॲडव्हांटेज विदर्भ अंतर्गत झालेल्या सामंजस्य करारानुसार ३ टेक्सटाईल कंपन्यांना जागा मंजूर करण्यात आली आहे.

टेक्सटाईल उद्योगाच्या सोईकरिता ५ एम.एल.डी.क्षमतेची सीईटीपी तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

पाणीपुरवठा करण्याकरिता २५.०० एमएलडी क्षमतेची पाणी पुरवठा योजना अप्पर वर्धा धरणातून कार्यान्वित करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने २० MVA क्षमतेचे ३३/११ के.व्ही.चे सब स्टेशन कार्यान्वित केले असून सद्य:स्थितीत १.७ MVA वीज पुरवठा करण्यात येत आहे. २० MVA क्षमतेचे ३३/११ के.व्ही.चे ०२ सब स्टेशनचे काम सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

स्थलांतरीत कुकशेत गावाला लागणा-या सुविधा देण्याबाबत

(१४) ४५५२२ (२७-०४-२०१६). श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुकशेत गाव हे नवी मुंबईतील एमआयडीसी क्षेत्रातील एमआयडीसी मार्फत नेरुळ से १४ नवी मुंबई येथील स्थलांतरीत केलेले गाव आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या स्थलांतरीत गावाला लागणा-या सुविधा दिल्या जाणार असल्याचे आश्वसन देण्यात आले असून अद्याप त्यांना सुविधांसाठी भूखंड मिळाला नसून गावामध्ये विविध मंदिरे व कौटुंबिक देव्हारे होते. पंरतु या मंदिरांनाही अद्याप भूखंड देण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुनर्वसित गावातील ग्रामस्थांच्या प्रलंबित मागण्या मान्य करुन गावकीसाठी मोकळा असलेला भूखंड गावकीच्या कौटुंबिक देव्हा-यासाठी/मंदिरासाठी मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (बेलापूर) यांनी दिनांक २९ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री महोदयांना निवेदन देऊन विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त विनंतीवर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.

(२) प्राथमिक शाळा, मंदिर,जिमखाना, दवाखना, महिला मंडळ, बँक, पोलीस स्टेशन,व्हीलेज पंचायत ऑफीस, पोस्ट ऑफीस,समाजमंदिर इत्यादी सामाईक सुविधांकरिता १६ भूखंड तसेच उद्यानाकरिता ४ भूखंड असे एकूण २० भूखंड नवी मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आले आहेत.

(३) मोकळा असलेला भूखंड गावकीच्या कौटुंबिक देव्हाऱ्यासाठी/मदिरासाठी मिळण्याबाबतचे स्थानिक लोकप्रतिनिधींचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील विकासवाडी येथील ७० हेक्टर व इतर ठिकाणी एमआयडीसीच्या मालकीची जागा परिवहन विभागाकडे विनावापर पडून असलेबाबत

(१५) ४६८७५ (२७-०४-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर मधील गोकुळ शिरगांव येथे एमआयडीसीच्या मालकीची जागा परिवहन विभागाकडे असलेबाबत नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परिवहन विभागाकडे असलेली व इतर ठिकाणची जागाही विनावापर पडून असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लेखी पत्राद्वारे निदर्शनास आणून दिले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, विकासवाडी येथील ७० हेक्टर जागेवर नवीन एमआयडीसीसाठी उद्योजकांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.
(२) गोकुळ शिरगाव औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्र.ए-४ चे ४२२२६ चौ.मी.इतक्या क्षेत्राचे वाटप महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळास करण्यात आले होते. त्यापैकी महामंडळाने ९७४.४५ चौ.मी.इतक्या क्षेत्रावर बांधकाम पूर्ण करुन बीसीसी प्राप्त केली होती. त्यामुळे महामंडळाने सदर क्षेत्राचा पूर्णपणे वापर न केल्यामुळे एकूण क्षेत्रापैकी २००२५ चौ.मी.इतके क्षेत्र पंचनामा करुन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने ताब्यात घेतले आहे.त्याविरुध्द परिवहन महामंडळाने मा.न्यायालयात दावा दाखल केला असून तो न्यायप्रविष्ट आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) करविर औद्योगिक क्षेत्रातील मौजे विकासवाडी येथील क्षेत्राच्या भूसंपादनाची कार्यवाही अद्याप पूर्ण होऊ शकलेली नाही.त्यामुळे भूखंडाच्या संदर्भात मागणी प्राप्त होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

कोकणात उभारण्यात येत असलेल्या ग्रीन रिफायनरीबाबत

(१६) ४८१७६ (२७-०४-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुनिल शिंदे (वरळी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारत पेट्रोलियम, इंडियन ऑईल आणि हिन्दुस्थान पेट्रोलियम या सरकारी कंपन्यांच्य माध्यमातून राज्यातील कोकण भागात सुमारे एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करणारा व सुमारे एक लाखापेक्षा अधिक रोजगार निर्मिती करणारा ग्रीन रिफायेनरी प्रकल्प (तेलशुध्दीकरण प्रकल्प) उभारण्याचे प्रस्तावित असून यावर चर्चा करण्यासाठी दिनांक २५ जानेवारी, २०१६ रोजी अथवा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री यांच्या वर्षा निवासस्थानी मा. केंद्रीय पेट्रोलियम मंत्री, राज्याचे मा. मुख्यमंत्री, मा. उदयोग मंत्री, मुख्य सचिव व इतर वरिष्ठ अधिकरी यांची बैठक आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पाचे स्वरुप काय आहे व याबाबत आता निर्णय घेण्यात आला आहे काय, असल्यास निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, शासनाने सदरहू प्रकल्पाची उभारणी कोकणातील कोणत्या जिल्ह्यात करावयाचे योजिले आहे आणि सदर उद्योगातील भरतीमध्ये स्थानिक भूमिपुत्रांसाठी राखीव जागा ठेवण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(४) या प्रकल्पासाठी जमीन प्राप्त होण्यासाठी स्थानिक शेतकऱ्यांशी शासनाने चर्चा केली आहे काय, असल्यास, स्थानिक रहिवाश्यांनी कोणत्या मागण्या केल्या आहेत,

(५) असल्यास, आधिच कोकणात असलेल्या जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पास कोकणवासियांचा विरोध असताना या ग्रीन रिफायनरीमुळे मासेमारीवर व मत्सोद्योगावर परिणाम होऊ नये याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे,

(६) तद्दनुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) शासनाने रत्नागिरी जिल्ह्यातील मार्गताम्हाणे येथील जमिन सदर प्रकल्पाकरिता सुचविली असून प्रकल्प अधिकारी व महामंडळाचे अधिकारी यांनी मार्गताम्हाणे येथील १५००० एकर जागेची दिनांक २४/६/२०१६ रोजी संयुक्तीक पहाणी केली असून महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियमानुसार प्रकरण ६ ची अधिसूचना प्रसिध्द करणेची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

भुसावळचे इंटिग्रेटेड टेक्सटाईल पार्क जामनेरला उभारण्याबाबत

(१७) ४८२८४ (२७-०४-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ शहरातील खडका, किन्ही भागातील एमआयडीसीमध्ये इंटिग्रेटेड टेक्सटाईल पार्क उभारण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांनी पसंती देवून पुढच्या दौ-यात पायाभूत सुविधा नसलेल्या जामनेर येथे इंटिग्रेटेड टेक्सटाईल पार्क उभारण्याचा मानस मा. मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भुसावळ येथील टेक्सटाईल पार्क जामनेर येथे हलवण्याच्या निर्णयाविरुध्द भुसावळच्या स्थानिक संघटनांनी शासनाकडे नाराजी व्यक्त करुन निदर्शने केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टेक्सटाईल पार्क भुसावळ येथे न उभारण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०९/१२/२०१५ च्या पत्रान्वये भुसावळ येथे इंटिग्रेटेड पार्क सुरु करणेबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक ९/१२/२०१५ रोजी निवेदन सादर केले होते.तसेच मा.मुख्यमंत्री महोदयांनी अमरावती येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे नांदगाव पेठ (जि.अमरावती), अतिरिक्त यवतमाळ (जि. यवतमाळ), चिखली (जि. बुलढाणा), माजलगांव (जि. बीड), कृष्णूर (जि. नांदेड), मालेगांव (जि. नाशिक), भालेर (जि. नंदुरबार), कन्नड (जि. औरंगाबाद), जामनेर (जि. जळगांव), सेलू (जि. परभणी) अशा १० ठिकाणी टेक्सटाईल पार्क उभारण्याची जाहिर घोषणा केली होती. त्यानुसार सदर ठिकाणी टेक्सटाईल पार्क स्थापित करण्याची कार्यवाही महामंडळातर्फे करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

एम.आय.डी.सी.धाटाव (ता.रोहा, जि.रायगड) येथील आरे, दापोली आदी गावातील पाणी पुरवठा योजना, वीज बिले न भरल्याने बंद असल्याबाबत

(१८) ५२१६२ (२७-०४-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एम.आय.डी.सी.धाटाव (ता.रोहा, जि.रायगड) येथील आरे, दापोली आदी गावांना एम.आय.डी.सी.मार्फत पाणी पुरवठा योजना राबविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित ग्रामपंचायती आर्थिकदृष्ट्या दुर्बल असल्याने पाणी पुरवठा योजनेपोटी येणारे वीज बिल न भरल्याने पाणी पुरवठा योजना बंद पडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बंद पडलेल्या पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्यासाठी एम.आय.डी.सी. पाणी पुरवठा योजनांची वीज बिले भरणार आहे काय,
(४) नसल्यास, कार्यान्वित योजना बंद पडल्यास, पाणी पुरवठ्याचा प्रश्न उद्भवणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) रोहा तालुक्यातील आरे, दापोली येथील गावाना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत पाणी पुरवठा योजना राबविण्यात आलेली नाही तथापि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सदर योजनेसाठी मागणी केल्यानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने जिल्हाधिकारी, रायगड यांच्यामार्फत रु.१९१३.६७ लक्ष इतका निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना उपलब्ध करुन दिला असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पूर्ण ठेव तत्वावर योजनेचे काम पूर्ण करण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) होय, हे खरे आहे.
(५) प्रत्येक घरटी पाणीपट्टी वसुल करुन आवश्यकतेप्रमाणे दैनदिन देखभाल, दुरुस्ती व परिचालनाकरीता निधी उभारण्यात येईल.

अहमदनगर येथील आयटी पार्क गेल्या १५ वर्षापासून बंद असल्याबाबत

(१९) ५२४२१ (२७-०४-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर येथील आयटी पार्क गेल्या १५ वर्षापासून बंद आहे, मात्र ही इमारत चालविण्यास उद्योजक तयार असतानाही अधिकारी व दलाल यांची हातमिळावणी असल्याने महामंडळ उदासिनता दाखवत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील उद्योजकांनी याप्रकरणी सीआयडी चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) हे खरे नाही.
आयटी पार्क इमारतीसाठी दिनांक ६/८/२०१४ व दिनांक २८/८/२०१४ रोजी तसेच दिनांक १३/५/२०१५ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे महामंडळाच्या संकेतस्थळावर दिनांक १४/५/२०१५ ते २/६/२०१५ या कालावधीसाठी सदर निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. तरीही उद्योजकांकडून प्रतिसाद प्राप्त झालेला नाही. तद्नंतर पुन्हा दिनांक १/४/२०१६ ते २१/४/२०१६ या कालावधीसाठी निविदा जाहिरात प्रसिध्द करण्यात आली

होती तथापि आयटी उद्योजकांकडून योग्य तितका प्रतिसाद प्राप्त न झाल्यामुळे शुध्दीपत्रक निर्गमित करुन निविदा सादर करण्याची मुदत दिनांक १२/६/२०१६ पर्यंत वाढविण्यात आली होती. त्या कालावधीत केवळ एक निविदा प्राप्त झाली असून उद्योजकांकडून योग्य तो प्रतिसाद प्राप्त झालेला नाही.

उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेऊन अंबड (नाशिक), लातूर,अहमदनगर, अमरावती,चिंचोली (सोलापूर) येथील औद्योगिक क्षेत्रातील आयटी प्रयोजनाकरिता बांधण्यात आलेल्या इमारतीचा वापर आयटी व्यतिरिक्त व्यापारी व इतर प्रयोजनाकरिता वाटप करण्याबाबतचा ठराव महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक ३०/७/२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये मंजूर करण्यात आला असून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणी सीआयडी चौकशी करण्यासंबंधीची उद्योजकांची मागणी प्राप्त झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई-ठाणे-पालघर येथील एमआयडीसीमध्ये एकुण ७२ भुखंड वापराविना पडून असल्याबाबत

(२०) ५२७०४ (२७-०४-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-ठाणे-पालघर येथील एमआयडीसीमध्ये एकुण ७२ भुखंड वापराविना पडून आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणत्या विभागातील भूखंड वापराविना पडून आहेत,

(३) असल्यास, वापराविना पडून असलेल्या भुखंडासंबधीतांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) होय. हे खरे आहे.

या क्षेत्रामधील ७० भूखंडाचा विकास केलेला नाही.

(२) मरोळ औद्योगिक क्षेत्र ४,ठाणे औद्योगिक क्षेत्र ३३ व तारापूर औद्योगिक क्षेत्र ३३ असे एकूण ७० भूखंडाचा विकास केलेला नाही.

(३) दि. ६.३.२०१३ पूर्वी विकास कालावधी समाप्त झालेल्या व विकास न केलेल्या भूखंडांना एक संधी म्हणून म. औ.वि.महामंडळाने उद्योग संजीवनी योजना लागू केली होती. या योजनेतंर्गत मागणी केलेल्या ३ भूखंडधारकांना उद्योग संजीवनी योजना मंजूर करण्यात आली आहे. उर्वरीत ६७ विकास न केलेल्या भूखंडांना करारनाम्यातील तरतुदीनुसार नोटिसा देऊन रितसर परत घेण्याची कारवाई सुरु आहे. त्यापैकी १३ भूखंड महामंडळाने परत घेतले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मार्गताम्हाने (जि. रत्नागिरी) येथे औदयोगिक वसाहत सुरु करण्यास विलंब होत असलेबाबत

(२१) ५४३७९ (२२-०८-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण व गुहागर तालुक्याच्या सीमेवर मार्ग ताम्हाने औदयोगिक वसाहत निर्माण करण्याचे धोरण शासनाने घेतले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या औदयोगिक वसाहतीसाठी जमीन अधिग्रहित करण्यात आली असून या ठिकाणी प्रदूषण विरहित कारखाने आणण्याचे शासनाचे धोरण आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही औदयोगिक वसाहत सुरू होण्याचे दृष्टीने शासनाकडून जाणीवपूर्वक विलंब केला जात आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, ही औद्योगिक वसाहत सुरु करण्याबाबत शासनाची भूमिका काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) रत्नागिरी जिल्ह्यातील मार्गताम्हाने औद्योगिक क्षेत्रासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ च्या तरतुदीनुसार ३३५२.७२ हे.आर. इतके क्षेत्र अधिसूचित करण्यासंबंधीची अधिसूचना दिनांक १४/१०/२०१० रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तथापि संबंधित शेतकऱ्यांनी संयुक्त मोजणीस विरोध केल्यामुळे भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झालेली नाही.तसेच सदर क्षेत्र महामंडळाच्या ताब्यात आल्यानंतर महामंडळातर्फे नो-हजार्डस व नो-केमिकल झोन म्हणून जाहिर करण्यात येणार आहे.

(४) मार्गताम्हाने औद्योगिक क्षेत्रासाठी अधिसूचित केलेल्या क्षेत्राच्या संयुक्त मोजणीस शेतकऱ्यांनी विरोध केल्यामुळे भूसंपादनाची कार्यवाही अद्यापपर्यंत पूर्ण होऊ शकली नाही. त्यामुळे उपविभागीय अधिकारी, चिपळूण यांनी प्रादेशिक अधिकारी यांच्यासोबत संबंधित खातेदारांच्या गावांमध्ये बैठका घेऊन त्यांना औद्योगिक क्षेत्राचे महत्व समजावून सांगण्यात येत आहे व त्यांचे मनपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

विंचूर (ता.निफाड जि.नाशिक) एम.आय.डी.सी मध्ये कृषीपुरक व अन्नप्रक्रिया उद्योगांसाठी परवानगी मिळणेबाबत

(२२) ५४४९७ (२२-०८-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विंचूर (ता.निफाड जि.नाशिक) एम.आय.डी.सी मध्ये कृषीपुरक व अन्नप्रक्रिया उद्योगधंद्यासाठी परवानगी मिळणेकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषीपुरक व अन्नप्रक्रिया उद्योगांकरिता एकत्रित सुविधा मिळावी याकरिता विंचूर वाईन पार्क मध्ये २०० एकर जागा उपलब्ध करुन द्यावी याबाबत दिनांक १६ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स व निमा ई.औद्योगिक संघटनांनी उद्योग मंत्र्यांकडे मागणी केली, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स व निमा या औद्योगिक संघटनांनी विंचूर वाईन पार्कमध्ये २०० एकर जागेची मागणी केल्यासंबंधीची बाब निदर्शनास आली नाही.

(३) विंचुर औद्योगिक क्षेत्रामध्ये महामंडळाच्या ताब्यात १३३.९९ हे.आर क्षेत्र असून यामध्ये टप्पा क्र. १ मधील १८.१९ हे.आर व टप्पा क्र. २ मधील ६५.०८ हे.आर क्षेत्रावरील सर्व भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे. तसेच टप्पा क्र. ३ मधील ५० हे.आर क्षेत्र विकसित करण्यात आलेले असून यामध्ये १० हे.आर क्षेत्र वाईन उद्योगाकरीता वाटप करण्यात आले आहे. उर्वरीत ४० हे.आर क्षेत्रामध्ये वाईन उद्योगास मागणी नसल्याने स्थानिक लोकप्रतिनिधीच्या मागणीनुसार ४० हे.आर क्षेत्रावर वाईन प्रकल्पाशिवाय अन्न प्रक्रिया उद्योग या प्रकल्पाकरीता भूखंड वाटप करण्याचा निर्णय महामंडळाने दि. ०२/०९/२०१५ रोजी घेतला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

डोंबिवली औद्योगिक क्षेत्रात सदोष बॉयलरचा वापर करणाऱ्या कंपनी मालकावर कार्यवाही करण्याबाबत

(२३) ५४७३६ (२२-०८-२०१६). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली औद्योगिक क्षेत्रात अनेक कंपन्यामध्ये नियमबाह्य बॉयलरची उभारणी करण्यात आली असून बॉयलर जुनाट असल्याने भविष्यात दुर्घटना घडू नयेत म्हणून सदोष बॉयलरचा वापर करणाऱ्या कंपनी मालकावर कारवाई करावी अशी मागणी एम.आय.डी.सी. निवासी महासंघाचे राजू नलावडे यांनी गेल्या सहा महिन्यापूर्वी एम.आय.डी.सी.कडे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी एमआयडीसीच्या संबधित अधिकाऱ्यांनी अद्याप कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय, असल्यास त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास,औद्योगिक क्षेत्रातील बॉयलर व तत्सम वस्तूची लवकर तपासणी करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सध्य:स्थिती काय आहे ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) बाष्पके संचालनालयामार्फत बाष्पकांची नियमित वार्षिक तपासणी केली जाते.नवीन बाष्पकांची नोंदणी झाल्यानंतर त्यांचा वापरदाब संचालनालयामार्फत विहीत करण्यात येतो.आठवडयातून दोन दिवस निरिक्षण अधिकारी दौरा नियोजित करतात. तसेच महाराष्ट्र बाष्पक नियम १९६२ अंतर्गत आवश्यकतेनुसार निरिक्षणासाठी विशेष भेटी देण्यात येतात.

अंबरनाथ मधील तीन एमआयडीसी झोन मध्ये ३०० आणि बदलापूर येथे १०० अशा एकूण ४०० केमिकल्स कंपन्या कार्यरत आहेत

(२४) ५४७५३ (२२-०८-२०१६). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ मध्ये तीन एमआयडीसी झोन यात ३०० आणि बदलापूर येथे १०० अशा एकूण ४०० केमिकल्स कंपन्या कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, डोंबिवली येथील एमआयडीसी क्षेत्रातील प्रोबेस केमिकल कंपनीत झालेल्या बॉयलर स्फोटाच्या पार्श्वभूमीवर अंबरनाथ - बदलापूर येथील केमिकल कंपन्यात अश्या प्रकारच्या घटना होऊ नयेत म्हणून कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सध्य:स्तिथी काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) अंबरनाथ व अति. अंबरनाथ औद्योगिक क्षेत्रामध्ये अनुक्रमे २०० व बदलापूर येथे १०५ रासायनिक कंपन्या कार्यरत आहेत.
(२) अंबरनाथ व बदलापूर या क्षेत्रातील रासायनिक कारखान्याचे सुरक्षा लेखा परिक्षण करण्यात येणार असून सदर क्षेत्रात उपलब्ध असलेल्या सुरक्षा तज्ञांना रासायनिक कारखान्यातील आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याचे प्रशिक्षण देण्याचे काम सुरु आहे. तसेच या क्षेत्रातील उद्योजक संघटनांच्या सहकार्याने अंबरनाथ विभागातील ३० कारखान्यातील ६५ कामगाराना व बदलापूर येथील २५ कारखान्यातील ४९ कामगारांना सुरक्षाविषयक प्रशिक्षण देण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

उरण तालुक्यात (जि. रायगड) एमआयडीसीच्या रानसई व जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागाचे पुनाडे या धरणाची पातळी वाढविण्याबाबत

(२५) ५५४३७ (२२-०८-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण तालुक्यात (जि. रायगड) एमआयडीसीच्या रानसई व जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागाचे पुनाडे अशी दोन धरणे असूनही या धरणातील पाण्याचे नियोजन करुन धरणाची पातळी वाढविल्यास उरण तालुक्याला बारमाही पुरेसा इतका मुबलक पाणीसाठा उपलब्ध होऊ शकेल हे खरे आहे काय,

(२) तसेच रानसई धरणाच्या गाळाचा सर्व्हे झाला असून धरणाची उंची वाढविण्याचा प्रस्ताव उद्योग विभागाकडे पडून आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) (२) व (३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अखत्यारीतील रानसई धरणाची उंची वाढविल्याने साठवण क्षमता १० द.ल.घ.मी. ऐवजी २० द.ल.घ.मी. होणार असल्याने त्यासाठी वन विभागाची जमिन संपादन करणे व ग्रामपंचायतीचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासंबंधीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच वन जमिन संपादन केल्यानंतर रानासई धरणाची उंची वाढविण्याचे काम महामंडळातर्फे हाती घेण्यात येणार आहे. तथापि पुनाडे धरणाच्या संदर्भात जलसंपदा विभागाच्या अखत्यारीत असलेल्या सहायक मुख्य अभियंता,जलसंपदा विभाग कोंकण प्रदेश, मुंबई यांनी गेल्या दहा वर्षात पुनाडे धरणात झालेल्या प्रत्यक्ष पाणीसाठयाची आकडेवारी पहाता धरण कधीही पूर्णक्षमतेने भरत नसल्याचे दिसून आले आहे.त्यामुळे अतिरिक्त पाणीसाठा निर्मितीसाठी धरणाची उंची वाढ करण्याचा प्रश्न उद्भवत नाही असे कळविले आहे. धरणातील उपलब्ध पाणी साठ्याचा विनीयोग करणे जलसंपदा विभागाच्या अखत्यारीत आहे.
(४) प्रश्न उद् भवत नाही.

राज्यातील दुष्काळी परिस्थितीत उद्योगधंद्याना प्रक्रिया केलेले पाणी वापरण्याबाबत

(२६) ५५८७५ (२२-०८-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दुष्काळी परिस्थितीत उद्योगधंद्याना प्रक्रिया केलेले पाणीच वापरण्याची सक्ती करणारी योजना आखली जात असल्याचे मा. उद्योगमंत्री यांनी जाहीर केले असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रीनफिल्ड औरंगाबाद इंडस्ट्रीजने वापरलेल्या पाण्याचे शुध्दीकरण करुन ते शुध्दपाणी पुन्हा उद्योगांना वापरणारे औद्योगिक क्षेत्र ठरणार आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सध्या मराठवाडा दुष्काळग्रस्त क्षेत्र असल्याने पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्याने मराठवाडयातील उद्योगधंद्यांना पाणीपुरवठा अत्यंत कमी होत असून त्यावर उपाय म्हणून उद्योगांनी वापरलेल्या पाण्यावर जलशुध्दीकरणाची प्रक्रिया करुन ते पुन्हा वापरण्याची खास योजना शासनाने हाती घेतली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर वापरलेल्या पाण्यावर जलशुध्दीकरण योजनेची अंमलबजावणी सुरु झाली आहे वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) हे खरे नाही.
तथापि दि.३०/०५/२०१६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या पाणी परिषदेमध्ये, प्रक्रिया केलेले सांडपाणी वापराबाबत चर्चा करुन त्याची व्यवहार्यता तपासून पुनर्वापर करता येण्याची शक्यता तपासणी करण्यासंबंधीचा मनोदय व्यक्त करण्यात आला होता. तथापि सक्ती करण्याचे जाहिर केलेले नाही.
(२) (३) व (४) मुंबई-दिल्ली औद्योगिक टप्प्याअंतर्गत औरंगाबाद औद्योगिक नगरी लि.(Aurangabad Industrial Township Ltd) या कंपनीमार्फत मुंबई- दिल्ली औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांकरिता सांडपाण्यावर प्रकिया (Recycling) करुन पाण्याचा वापर करण्यासंदर्भात औद्योगिक क्षेत्रनिहाय पाण्याचा वापर, निर्माण होणारे सांडपाणी व सांडपाण्यावर पुनर्वापरासाठी करावा लागणारा शुध्दीकरण खर्च व त्याची मागणी या सर्व बाबींची व्यवहार्यता तपासून औद्योगिक क्षेत्रनिहाय प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर करण्यासंबंधीची बाब महामंडळाच्या विचाराधीन होती. त्यानुसार महामंडळाने धोरणात्मक निर्णय घेतला असून सांडपाण्याचा पुनर्वापर करण्यासंबंधी पहिल्या टप्प्यात डोबिंवली व अंबरनाथ या औद्योगिक क्षेत्रासाठी व्यवहार्यता तपासण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद शहरातील मद्यनिर्मिती कंपन्यांकडे असलेली पाण्याची थकबाकी वसूल करण्याबाबत

(२७) ५५९६८ (११-०८-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरातील मद्यनिर्मिती करणाऱ्या कंपन्यांकडे पाण्याची २२ कोटी ६६ लाख ३६ हजार रुपयांची थकबाकी असल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०१६ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत चौकशी करण्यात आली काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरील मद्यनिर्मिती कंपन्यांकडे असलेली पाण्याची थकबाकी वसूल करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) औरंगाबाद शहरातील म.औ.वि. महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील मद्यनिर्मिती करणाऱ्या कंपन्यांकडे पाण्याची रूपये २१,५९,६३,२८४/- इतकी थकबाकी ऑक्टोबर २०१६ अखेर पर्यंतची असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) होय,

(३) म. औ. वि. महामंडळाने दि. ७.१०.२०११ रोजीच्या परिपत्रकानुसार सुधारीत केलेल्या दरानुसार मद्यनिर्मिती करणाऱ्या कंपन्या पाणी देयके नियमित अदा करत आहेत. तथापि, पूर्वलक्षी प्रभावाने सुधारीत केलेल्या देयकांवरील विलंब शुल्क अदा केलेले नाही.दरम्यानच्या कालावधीत निरी संस्थेने केलेल्या पाणी वापराच्या विगतवारीनुसार महामंडळाने आकारलेल्या दराच्या विरुध्द कच्चा माल वापरणाऱ्या वापरकर्त्यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.त्यावर मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी महामंडळाने पाण्यासंबंधी आकारलेले शुल्क योग्य असल्याचा निर्णय दिला व त्या निर्णयाविरुध्द जर याचिकाकर्ते सर्वोच्च न्यायालयात दावे दाखल करणार असतील तर त्यानी महामंडळाने दिलेल्या देयकाच्या ५०% रक्कम महामंडळाकडे दोन आठवडयात अदा करावी असे आदेश दिले होते.त्या आदेशाविरुध्द काही उद्योजकानी मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे विशेष याचिका दाखल केल्या असून त्या न्यायप्रविष्ट आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडारसाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळत नसल्याबाबत

(२८) ५५९९८ (२२-०८-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडारसाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळत नसल्यामुळे औरंगाबाद मधील निलजंगम, जांभळी, चिचांली, मेहरबार नाईक तांडा परिसरातील शेतकऱ्यांनी मोबदला लवकर न मिळाल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पात बाधीत झालेल्या शेतकऱ्यांना उचित मोबदला त्वरीत मिळावा यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) अन्नदाता शेतकरी संघटना, औरंगाबाद यांच्यामार्फत उपविभागीय अधिकारी, पैठण विभाग यांना दिनांक २०/५/१६ रोजी निवेदन दिल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडारसाठी औरंगाबाद येथील अधिसूचित झालेल्या एकूण ८७५.९१.५ हे. आर. क्षेत्रासाठी महामंडळाने उपविभागीय अधिकारी, फुलंब्री यांना आतापर्यंत

रुपये ४५० कोटी इतका निधी नुकसान भरपाईची रक्कम वाटप करण्यासाठी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यापैकी त्यानी ६१९.६१ हे.आर क्षेत्रातील संबंधित खातेदारांना रु.३५१ कोटी इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून वाटप केली असून उर्वरित क्षेत्रातील खातेदारांकडून जमिनीचा वारसा हक्क , शेतजमिनीचा न्यायालयीन वाद अशा स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झाल्यामुळे त्यासंदर्भात महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ च्या कलम ३५ व३६ मधील तरतुदीनुसार योग्य तो निर्णय घेऊन संबंधितांना मोबदला अदा करण्यासंबंधीची कार्यवाही उपविभागीय अधिकारी, पैठण फुलंब्री यांच्यामार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्हयातील बारवी धरणाच्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत

(२९) ५६३६६ (२२-०८-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.अमित घोडा (पालघर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील बारवी धरणाची उंची ६५.७० मीटरवरुन ६८.६० मीटरपर्यंत वाढविण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे काचकोळी व तोंडली या गावातील ६० कुटुंबे विस्थापित होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या विस्थापित कुटुंबाचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच ठाणे जिल्हयातील पाणीटंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठी बारवी धरणांची उंची वाढविण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे बारवी धरणाच्या सांडव्याकडील भागाची ६८.६० मी.तलांकापर्यंत उंची वाढविण्याचे काम दिनांक १५/१०/२०१५ पासून सुरु करण्यात आले असून ते दिनांक ७/१२/२०१५ रोजी पूर्ण करण्यात आले आहे.

(२) बारवी धरणाची सांडव्याकडील भागाची उंची ६८.६० मी. पर्यंत वाढविल्यामुळे काचकोली व संलग्न पाडयातील एकूण ७९ घरे तर तोंडली येथील सुमारे ४१ घरे पाण्याखाली जातील. त्यामुळे एकूण १२० कुटुंबांचे स्थलांतर होणार आहे.

(३) काचकोली व तोंडली येथील १२० घरे स्थलांतरीत करण्याकरिता महामंडळाने १२० निवासी संकुले भाडेतत्त्वावर घेण्याचे योजिले होते. त्यानुसार ३० निवासी संकुलांकरिता भाडेकरारनामा करुन ताब्यात ठेवण्यात आल्या आहेत.यामध्ये २१ कुटुंबाना स्थलांतरीत करण्यात आलेले आहे. तथापि काचकोली गावातील ग्रामस्थानी निवासी संकुलामध्ये स्थलांतरीत होण्यास नकार दिल्यामुळे येथील ग्रामस्थ तसेच तोंडली गावातील आदिवासी कुटुंबाकरिता व जनावरांकरिता बुडीत क्षेत्रापासून उंच जागेवरती तात्पुरत्या छावण्यांची उभारणी महामंडळामार्फत करण्यात आलेली आहे.

(४) बारवी धरणाच्या सांडव्याची उंची ६८.६० मी. तलांकापर्यंत वाढविल्यामुळे बारवी धरणामध्ये एकूण २३४.७१ द.ल.घ.मी.इतका पाणीसाठा झालेला आहे. त्यामुळे पूर्वीच्या एकूण पाणीसाठयापेक्षा ४०% इतकी पाण्याच्या साठ्यात वाढ झाली आहे. त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील पाणीटंचाईचा प्रश्न सोडवण्यास मदत होणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे अजुर्णी (ता.कागल, जि.कोल्हापूर) येथील औद्योगिक वसाहतीस शेतकऱ्यांनी विरोध दर्शविल्याबाबत

(३०) ५६९९६ (२२-०८-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अजुर्णी (ता.कागल, जि.कोल्हापूर) येथे उभारावयाच्या औद्योगिक वसाहतीस शेतकऱ्यांनी विरोध दर्शवून तलाठी कार्यलयासमोर दिनांक ३१ मे, २०१६ रोजी ठिय्या आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर औद्योगिक वसाहतीस मौजे अर्जुनी, गायकवाडी व कोडणी इ. ग्रामस्थांचा विरोध आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) मौजे अर्जुनी येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी मौजे अर्जुनी,कागल येथील ४.५३ हे.आर सरकारी व २४३.१७ हे.आर खाजगी क्षेत्रास म.औ.वि.अधिनियम १९६१ च्या प्रकरण ६ च्या तरतुदी लागू करण्यासंबंधीची अधिसूचना दि. २४.३.२०११ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे. तद्नंतर सदर अधिनियमाच्या कलम ३२(२) नुसार खातेदारांच्या वैयक्तिक हरकती मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार बहुतेक खातेदारांनी भूसंपादनास

हरकती घेतल्या आहेत व या संदर्भात खातेदारांसोबत भूसंपादन अधिकारी यांनी दि. १६.३.२०१६ रोजी बैठक घेतली. यामध्ये क्षेत्राची स्थळपाहणी करुन संयुक्त मोजणी अहवाल तयार करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. तथापि खातेदारांनी प्रत्यक्षात सदर क्षेत्राची संयुक्त मोजणी होऊ दिलेली नाही. त्यामुळे जिल्हाधिकारी कोल्हापूर यांनी दिनांक १९/८/२०१६ च्या पत्रान्वये सविस्तर अहवाल सादर केला असून त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

काजूचे गतवर्षीपेक्षा अल्प उत्पदान झाल्याने काजू प्रक्रिया उद्योग अडचणीत आल्याबाबत

(३१) ५७६६३ (२२-०८-२०१६). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गतवर्षीपेक्षा काजूचे अल्प उत्पदान झाल्याने काजू प्रक्रिया उद्योग अडचणीत आला असून कोकणातील ८० टक्के प्रक्रिया उद्योग सध्या बंद अवस्थेत असून या साऱ्याचा परिणाम काजूवर आधारित उद्योग व व्यवसायावर झाला असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यंदा काजू बीचे उत्पादन कमी झाल्याने प्रक्रिया उद्योगांना कमी काजू बी उपलब्ध असल्याने कारखाने चालविण्यासाठी काजू बी आवश्यक असल्याने याकरिता व्यापाऱ्यांमध्ये स्पर्धा सुरु असून आर्थिक परिस्थिती नसल्याने प्रक्रिया उद्योग बंद आहेत,हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासन आवश्यक कार्यवाही केली वा करीत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुभाष देसाई (२९-०५-२०१७) :(१) व (२) हे खरे नाही.

काजू प्रक्रिया उद्योग बंद असल्याबाबत कोणतेही लेखी निवेदन जिल्हा उद्योग केंद्र, रत्नागिरी, सिंधूदूर्ग व कोल्हापूर यांच्याकडे प्राप्त झालेले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य शासनाने अपंगाच्या नोकरीमधील अनुशेष भरण्याबाबत

(३२) ५८६४५ (२०-०८-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) येथे राज्य शासनाने अपंगाच्या नोकरी मधील अनुशेष भरुन काढण्यासाठी विशेष भरती मोहिम राबविण्याचा संकल्प केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील पाच वर्षात ५ हजार ६३९ जागेपैकी केवळ २ हजार ८८६ जागा भरण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित २ हजार ७७६ जागांचा अनुशेष शिल्लक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उर्वरित अपंगाचा अनुशेष शासन भरणार आहे काय,
(५) असल्यास, त्याचा कालावधी काय आहे,
(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले (०३-०४-२०१७) :(१), (२), (३), (४) व (५) अपंग अधिनियम १९९५, ची राज्यात सन १९९६ पासून जशीच्या तशी अंमलबजावणी करण्यात येत असून, सदर अधिनियमातील तदतूदीनुसार शासकीय सेवेत अपंगाकरीता एकूण ३ टक्के आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. त्यानुसार राज्य शासनामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

या विभागाकडून अपंग अधिनियम १९९५ मधील तरतूदीच्या अंमलबजावणीविषयक केवळ समन्वयाचे कामकाज हाताळण्यात येते मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल असलेल्या रिट याचिका क्र.३२९४/२०१० निलिमा अनंत सुर्वे विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर या न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने शासन सेवेतील अपंगांचा अनुशेषबाबत मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभागांकडून (डिसेंबर, २०१० पर्यतची) माहिती संकलीत करुन मा.उच्च न्यायालयास सादर करण्यात आली व त्यानंतर ही सदर माहिती संकलीत करुन वेळोवेळी मा.उच्च न्यायालयात सादर करण्यात येत आहे. त्यानुसार दि.३०.१२.२०१५ पर्यतची विविध प्रशासकीय विभागांकडून उपलब्ध माहितीनुसार राज्य शासनाच्या विविध प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयामध्ये अंदाजे २५७३ पदांचा अनुशेष शिल्लक असल्याने दिसून आले.

अपंगांचा अनुशेष भरुन काढणेसाठी यापूर्वी विशेष भरती मोहिम राबविणेबाबत दि.८.८.२०११ रोज शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे. सदर शासन परिपत्रकातील सूचना दिनांक २३.७.२००५ च्या अर्ध शासकीय पत्रान्वये पुनश्च: सर्व विभागांना सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तसेच शासन सेवेतील अपंगांच्या अनुशेषाची पदे तातडीने भरण्यासंदर्भात प्रधान सचिव (सा.न्याय) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ३०.१२.२०१५ रोजी मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभागांची बैठक आयोजित करण्यात येऊन विशेष भरती मोहिम राबवून अपंगांचा अनुशेष तातडीने भरण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे दि.३०.१२.२०१६ व ४.०१.२०१७ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये अपंगांचा अनुशेष तातडीने भरण्याबाबत सुचित करण्यात आले असून अपंगांच्या रिक्त पदाची अद्यावत माहिती पाठविण्याबाबत सर्व विभागांना कळविण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

बारवी धरणाची उंची वाढविण्यात आलेली असतांना १४० द.ल.लि. अतिरिक्त पाणी उपलब्ध करून देण्यासाठी होत असलेली दिरंगाई

(३३) ५९२८८ (२६-०८-२०१६). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण शहरात लोकसंख्येची अधिक घनता असल्याने शहरात पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बारवी धरणाची उंची वाढविण्यात आलेली असतांना १४० द.ल.लि. अतिरिक्त पाणी उपलब्ध करून देण्यासाठी दिरंगाई होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) अंशत: खरे आहे.

नव्याने समाविष्ठ गावे, गावठाणे, दाट वस्तीचा परिसर व उंच सखल भागात पाण्याच्या समस्या आहेत.

(२) व (३) बारवी धरणाची क्षमता सुमारे ५६ द.ल.घ.मी. ने वाढली असली तरी आंद्र प्रकल्पात मागील वर्षी फक्त ६२.८०% पाणी साठा झाला आहे. तसेच कल्याण डोबिवली महानगरपालिकेच्या स्वतंत्र पाणीपुरवठा योजनेसाठी म. औ.वि.महामंडळाच्या प्रती दिन ७७० द.ल.ली. मंजूर कोट्यातून ११७ द.ल.ली.प्र. दि. आरक्षण जलसंपदा विभागाने वगळल्याने महामंडळास सद्य:स्थितीत ५८३ द.ल.ली.प्र.दि. पाणी उचलण्याची परवानगी दिली आहे. तसेच नवी मुंबई महानगरपालिकास महामंडळाकडून मोरबे धरण कार्यान्वित होईस्तव मंजूर १४० द.ल.ली.प्र.दि. कोटा पाणी सदरचे धरणाचे काम पुर्ण झाले असले तरी अद्यापही ६५ द.ल.ली.प्र.दि. पुरवठा केला जातो. सदरचे नवी मुंबई महानगरपालिकेस मंजूर १४० द.ल.ली.प्र.दि. कोटा कल्याण डोबिवली महानगर पालिकेस बारवी धरणाची उंची वाढविल्यानंतर हस्तांतरण करण्याचा निर्णय शासन स्तरावर दि. १३/८/२००९ रोजी घेतला आहे. या व्यतिरिक्त मिरा भाईंदर महानगरपालिकेला ५० द.ल.ली.प्र.दि. व उल्हासनगर पालिकेस वाढीव ४५ द.ल.ली.प्र.दि. पुरवठा मंजूर कोट्यातूनच करत असल्याने महामंडळास जलसंपदा विभागास मंजूर केलेल्या ५८३ द.ल.ली.प्र.दि. आरक्षणामधून वितरीत करण्यात येत असलेल्या कोणत्याही आस्थापंनाच्या पाणीपुरवठ्यात वाढ करता येत नाही. उल्हास नदितील पाण्याचे नियोजन व वाटप जलसंपदा विभागातर्फे करण्यात येत असल्यामुळे महामंडळातर्फे कोणत्याही आस्थापनांच्या पाणीपुरवठ्यात वाढ करणे ही बाब महामंडळाच्या अखत्यारीत नाही.

(४) प्रश्न उद् भवत नाही.

डोंबिवली, जि . ठाणे एमआयडीसी च्या मुख्य पाईपलाईन वर अनधिकृत नळजोडण्या करून मोठ्या प्रमाणावर पाणीचोरी होत असल्याबाबत

(३४) ५९६८८ (२२-०८-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली, जि . ठाणे येथील एमआयडीसी च्या मुख्य पाईपलाईन वर अनधिकृत नळजोडण्या केल्यामुळे दररोज सुमारे ५ एमएलडी पाणी चोरी होत असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाईपलाई वरील अनधिकृत नळजोडण्या तोडण्याचा निर्णय एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्यापपर्यंत किती जणांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) उप अभियंता व स्वीय सहाय्यक, म. औ.वि.महामंडळ, डोंबिवली यांनी अनधिकृत नळजोडण्या करणाऱ्या १८३ व्यक्ती विरुध्द फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत. तक्रारीच्या अनुषंगाने पोलिसांनी दोन व्यक्तिंना अटक करुन त्यांच्याविरुध्द गुन्हा रजि.नं.१६३/२०१६ व गुन्हा रजि.नं २५४/२०१६ हा भा.द.वि. संहितेच्या कलम ३७९, ४२७ अन्वये अनुक्रमे दि.०२.०४.२०१६ व दि.१३.०५.२०१६ रोजी गुन्हा नोंदविला आहे. महामंडळाने सन २०१३ ते २०१६ पर्यत ११७४ इतक्या अनधिकृत नळजोडण्या निष्कसीत केल्या आहेत. तथापि काही अनधिकृत नळजोडण्या पुन:श्च जोडण्यात येतात. अनधिकृत नळजोडणी कोणी घेतली हे शोधणे जिकीरीचे काम असल्याने संबंधित व्यक्तिवर गुंन्हा दाखल करणे शक्य होत नाही. त्यामुळे जलवाहिनीवरील अनधिकृत नळजोडण्या निष्कसित करण्याकरीता पोलिस उपायुक्त परिमंडळ, उल्हासनगर यांना उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती करण्यात आलेली असून पुढील कारवाई महामंडळामार्फत करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

हर्डीलिया केमिकल कंपनीमुळे विस्थापित झालेल्या कुकशेत गावामधील प्रकल्पग्रस्तांना नोकरीमध्ये डावलले जात असत्याबाबत

(३५) ६०५६४ (२२-०८-२०१७). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हर्डीलिया केमिकल कंपनीमुळै विस्थापित झालेल्या कुकशेत गावामधील प्रकल्पग्रस्तांना नोकरीमध्ये डावलले जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे बेलापुर पट्ट्यात औद्योगिक वसाहत बसविण्याकरिता शासनाने ठाणे, पनवेल, व उरण तालुक्यातील ९५ गावांतील शेतकऱ्यांची जमीन संपादित केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अन्य मुळ गावे वगळता सुरक्षेच्या कारणामुळे कुकशेत गावाचे स्थलांतर केले गेले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, कुकशेत ग्रामस्थांनी स्थानिक प्रतिनिधींसह हर्डीलिया कंपनीच्या व्यवस्थापनाशी वारंवार बैठका घेऊन स्थानिक बेरोजगारांना नोकरी देण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, हर्डीलिया व्यवस्थापनाने या मागणीकडे लक्ष दिलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, स्थानिकांना नोकरीत प्राधान्य देण्याकरिता शासन काय कार्यवाही केली वा करणार आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) :(१) अशी वस्तुस्थिती नाही.

(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने ठाणे जिल्हयातील १९ गावामधील २३३३ हे.आर इतके क्षेत्र टि.टि.सी. औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी संपादित केले होते. त्यामध्ये कुकशेत गावाचा समावेश करण्यात आला होता.

(३) होय हे खरे आहे.

(४) व (५) कुकशेत ग्रामस्थांनी हर्डीलिया कंपनीच्या व्यवस्थापनासोबत स्थानिक बेरोजगारांना नोकरी देण्यासंबंधी बैठका घेण्यासंबंधीची मागणी केल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(६) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत उद्योजकासोबत करण्यात येणा-या प्राथमिक करारनाम्यात स्थानिक प्रकल्पग्रस्तांना नोकरीमध्ये प्राधान्य देण्यात यावे या अटीचा समावेश करण्यात येतो. तसेच शासनाने दिनांक १७/११/२००८ च्या शासन निर्णयान्वये ८०% स्थानिक उमेदवारांना नोकरीत प्राधान्याने घेण्यासंबंधी धोरण निश्चित केले आहे व सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी व्यवस्थितपणे होत आहे किंवा नाही याचा आढावा घेण्यासाठी जिल्हा स्तरावर समिती गठीत करण्यात आली आहे तर राज्य पातळीवर समन्वय,अंमलबजावणी व संनियंत्रण करण्यासाठी विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय,मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

भोसरी (जि. पुणे) येथील औद्योगिक विकास महामंडळाची जमीन अत्यल्प किंमतीला माजी महसूल मंत्री यांनी पत्नी व जावयाच्या नावाने खरेदी केल्याबाबत

(३६) ६१०५९ (२२-०८-२०१६). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अनिल कदम (निफाड) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोसरी (जि. पुणे) येथील औद्योगिक विकास महामंडळाची ३ एकर जमीन अत्यल्प किंमतीत माजी महसूल मंत्री यांनी त्यांच्या पत्नी व जावयाच्या नावाने खरेदी केल्याची बाब दिनांक २३ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच माजी महसूल मंत्र्यांच्या स्वीय सहायक असल्याचा दावा करणाऱ्या गजानन पाटील यांनी माजी महसूल मंत्र्याच्या नावाचा संदर्भ घेऊन ठाणे जिल्हयातील एका शिक्षण संस्थेला शासनाची जमीन मिळवून देण्यासाठी ३० कोटी रुपयाची लाच मागितल्याबाबतची तक्रार पोलिसांकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधितांविरुद कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) दस्तऐवज नोंदणी झाल्याची बाब निदर्शनास आली आहे हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

अध्यक्ष, इंटरनॅशनल सोसायटी फॉर एक्सलन्स इन प्रोजेक्ट मॅनेजमेंट एन्ड रिसर्च, मुंबई यांनी श्री गजानन पाटील यांचे विरुध्द दि. २२/९/२०१५ रोजी तक्रार केली आहे.
(३) १) मूळ भूधारक श्री. उकाणी यांनी खरेदी खत व्यवहारापूर्वी सन्मा. उच्च न्यायालयात याचिका क्र. १००००/२०१५ दाखल केली असून ती न्यायप्रविष्ठ आहे. तसेच शासनाने प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधिश श्री झोटींग यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समितीची नियुक्ती केली असून समितीस उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) पुणे व म. औ. वि. महामंडळाकडून आवश्यक माहिती पुरविण्यात आली आहे.
२) आरोपी श्री. गजानन पाटील हे महसूल मंत्री यांचे स्वीय सहाय्यक नसल्याचे आढळून आले. त्यांनी फिर्यादी डॉ. रमेश जाधव यांच्याकडे महसूल मत्र्यांकडे फिर्यादी संस्थेचे रिव्हीजन ६८/१५ हे महसूल मंत्र्याकडे प्रलंबित सागून दि. ५.५.२०१६ रोजी रुपये ३० कोटीची मागणी कागदावर लिहून केली आहे. तथापि सदरचे काम हे महसूल विभागाकडून दि.२५.२.२०१६ रोजीच निर्णय घेऊन काम संपुष्टात आल्याचे दिसून आले. त्यानुसार आरोपी श्री पाटील यांच्यावर गुन्हा नोंदवून त्यांना दि. १३.५.२०१६ रोजी अटक करण्यात आली असून आरोपी श्री पाटील यांचे विरुध्द मा. विशेष न्यायालयात, विशेष खटला क्र. ४१/२०१६ अन्वये दि. १९/७/२०१६ रोजी दोषारोप दाखल करण्यात आले आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालकांनी एशियन कान्सिर्ज ट्रान्सपोर्ट लि.या कंपनीला २५० वातानुकुलीत बस पुरविण्यासाठी तब्बल ९९.५० कोटी रूपये देण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत

(३७) ६५३२५ (१७-१२-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य परिवहन मंडळाने भाडेतत्त्वावर ३०० वातानुकुलीत बस पुरविण्याचा ठेका एशियन कान्सिर्ज ट्रान्सपोर्ट लि.या कंपनीला दिला असून या कंपनीने त्यातील २५० गाडयांसाठी मुंबई बँकेकडे ९९.५० कोटीच्या कर्जाची मागणी केली असता केवळ ६ महिन्यांपूर्वीच १४ कोटीच्या भागभांडवलावर उभारण्यात आलेल्या कंपनीला मुंबई बँकेकडून १०० कोटीचे कर्ज देण्याबाबत प्रक्रिया पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भ्रष्टाचारांच्या आरोपावरून मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक चर्चेतअसून या बँकेची सध्या सहकारी विभागामार्फत चौकशी सुरू असताना केवळ १४ कोटीच्या भागभांडवलावर १०० कोटीचे कर्ज देण्याबाबत निर्णय घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, बँकेच्या या गैरकारभाराबाबत काही संचालकांनी सहकार आयुक्त आणि नाबार्डकडे तक्रार करून या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

श्री. सुभाष देशमुख (०५-०६-२०१७) : (१) नाही.
मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने एशियन कान्सिर्ज ट्रान्सपोर्ट लि. या कंपनीला कर्ज मंजूर केलेले नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) होय.
मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक श्री.शिवाजीराव नलावडे व इतर ६ संचालकांनी मा.मुख्य महाव्यवस्थापक यांचेकडे दिनांक ३०/७/२०१६ रोजीच्या पत्राने एशियन कान्सिर्ज ट्रान्सपोर्ट लि. या कंपनीस रू.९९.५० कोटी रकमेचे कर्ज मंजूर करण्यास विरोध असल्याचे कळविले होते.
(४) होय.
(५) मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने एशियन कान्सिर्ज ट्रान्सपोर्ट लि. या कंपनीचा रू.९९.५० कोटी रकमेचा कर्ज मंजूरीचा प्रस्ताव बँकेच्या कर्जधोरणानुसार योग्य नसल्याने परत केला आहे. त्यामुळे पुढील कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

आष्टी (जि. बीड) येथिल एम. आय. डी. सी. क्षेत्रातील उद्योगांबाबत

(३८) ६६१२६ (१६-१२-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आष्टी (जि. बीड) येथील एम.आय.डी.सी. क्षेत्रातील अनेक उद्योग सद्य:स्थितीत बंद अवस्थेत आहेत, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, या बंद उद्योगांबाबत शासनाचे धोरण काय आहे;
(३) तसेच सदर क्षेत्रात विहित मुदतीत उद्योग न उभारणाऱ्या उद्योजकांच्या जमिनी शासन परत घेणार आहे काय;
(४) नसल्यास, उक्त प्रकरणी शासनाची भूमिका काय आहे?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) वाटप करणेत आलेल्या ४८ भुखंडापैकी २० भुखंडधारकाचा विकास कालावधी शिल्लक असुन विकास कालावधी संपलेल्या २५ भुखंडधारकापैकी १२ भुखंडधारकांनी उद्योग संजिवनीमध्ये भाग घेवून विकास कालावधी वाढवून घेतला आहे. ३ भुखंडधारकांना BCC प्राप्त केली असल्याने उत्पादन सुरु करणे अपेक्षित आहे. ज्या भूखंडधारकांनी विकासाच्या विहित कालावधीमध्ये भूखंडाचा विकास केलेला नाही, अशा भूखंडधारकास दि. ६.३.२०१३ रोजीच्या परिपत्रकानुसार विशेष मुदतवाढ योजना लागू करुन त्यास दि. २३.१०.२०१५ रोजीच्या परिपत्रकानुसार वाढीव मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच ज्या भूखंडधारकाचे भूखंड मोकळे असून भूखंडधारकांनी मुदतवाढीकरीता महामंडळास संपर्क केलेला नाही, अशा सर्व भूखंडधारकास भूखंड विकास करण्याची शेवटची संधी म्हणून उद्योग संजीवनी योजना २०१५ राबविण्यात येत असून. सदर योजनेतंर्गत दि. ३०.४.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार जे भूखंड अद्याप मोकळे आहेत व ज्या भूखंडधारकांनी या योजनेंतर्गत सहभाग घेतलेला नाही. अशा भूखंडधारकांवर, महामंडळाच्या धोरणानुसार आणि करारनाम्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येऊन असे भूखंड महामंडळाच्या ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

अंबरनाथ (जि.ठाणे) येथील मौजे - कानसई, वडोलगाव येथील डी.डी.स्कीम १५ पैकी, सिटी सर्वे नं.४००३ मधील सीट नं.१८ आणि २५ ही जागा एम.आय.डी.सी.कडून वगळून देण्याबाबत

(३९) ६७२२५ (१६-१२-२०१६). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील मौजे - कानसई, वडोलगाव येथील डी.डी.स्कीम १५ पैकी, सिटी सर्वे नं.४००३ मधील सीट नं.१८ आणि २५ मधील रहिवाश्यांच्या राहत्या घरांची जागा एम.आय.डी.सी.कडून वगळून देण्यासंदर्भाची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १७ सप्टेंबर, २०१६ रोजी व त्यासुमारास मा.उद्योग मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी मा.उद्योग मंत्री महोदयांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बैठकीच्या अनुषंगाने एम.आय.डी.सी.कडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.
स्थानिक लोकप्रतिनिधीनी दि. ११/०९/२०१५ रोजी पत्र पाठवून याबाबत मागणी केली आहे.
(२) होय, हे खरे आहे.

दि.१४/०१/२०१५ रोजी मा.मंत्री (उद्योग) यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती.

(३) महामंडळाच्या अंबरनाथ औद्योगिक क्षेत्राच्या नियोजन आराखडयामध्ये रहिवाशांची राहत्या घरांची जागा मोकळी जागा -८ म्हणून दर्शविण्यात आली असून त्या जागेच्या आजूबाजूस अंबरनाथ औद्योगिक क्षेत्रातील औद्योगिक भूखंड असल्याने व प्रस्तुत जागा औद्योगिक क्षेत्राच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने नियोजन दृष्टया जागा वगळणे शक्य होणार नाही असे महामंडळाच्या नियोजन विभागाचे अभिप्राय आहेत. तथापि सदर क्षेत्राच्या संपादनाबाबत महसूल विभागाकडून सविस्तर दस्तऐवज व सिटी सर्व्हे नं. १८ व २५ बाबत सविस्तर लेखा तपासून घेण्यात येत असून औद्योगिक विकासाच्या दृष्टीने भविष्यात कोणतेही अडथळे निर्माण होऊ नयेत या दृष्टीने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद् भवत नाही.

हलकर्णी (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील ट्रामा केअर युनिटसाठी हलकर्णी एमआयडीसीतील ५ एकर जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

(४०) ७११७७ (१६-१२-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हलकर्णी (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील ट्रामा केअर युनिटसाठी हलकर्णी एमआयडीसीतील ५ एकर जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी मा.उद्योग मंत्री यांचेकडे चंदगडचे लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २६ जुलै, २०१६ रोजी वा तत्पूर्वी अनेकवेळा केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२) म.औ.वि.महामंडळाच्या संचालक मंडळाची दि.३०/०७/२०१६ रोजी संपन्न झालेल्या ३६७ व्या बैठकीमध्ये विषयांकित बाबीवर भूखंड वितरीत करण्याबाबत निर्णय झालेला आहे. त्याअनुषंगाने उपजिल्हा रुग्णालय व ट्रामा केअर युनिटकरिता भूखंड वाटपाची पुढील कार्यवाही म. औ. वि. महामंडळामार्फत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

उमरगा एम.आय.डी.सी आणि खादी ग्रामोद्योग वसाहत(जि. उस्मानाबाद) येथे पायाभुत सुविधा पुरविणेबाबत

(४१) ७२२५९ (१६-१२-२०१६). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरगा (जि. उस्मानाबाद) येथे एम.आय.डी.सी. आणि खादी ग्रामोद्योग वसाहत होऊन साधारण २५ वर्षे झालेली आहेत, परंतु आजपर्यत येथे कोणत्याही प्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध झालेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उमरगा एम.आय.डी.सी आणि खादी ग्रामोद्योग वसाहत येथे पायाभुत सुविधा पुरविणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १४ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत उमरगा येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यात आले असून तेथे महामंडळातर्फे सर्व सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. तसेच खादी ग्रामोदयोग वसाहत उमरगा येथे डी-१ व डी-२ असे दोन भुखंड राखीव ठेवण्यात आले आहेत. त्यापैकी भूखंड क्र. डी-१ ला, खडीमुरुमाचा रस्ता, पाणीपुरवठा जलवाहिनी, पथदिवे इत्यादी प्रकारच्या सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. व भूखंड क्र.डी-२ च्या उर्वरीत आराखडयातील विकास कामाचा रु.६६.३२ लक्ष (नक्त) व रु.७६.२७ लक्ष (ठोक) रक्कमेचा प्रशासकीय मंजुरीचा प्रस्ताव मंजूरीच्या प्रक्रियेत आहे. मंजूरी नंतर विकास कामे हाती घेण्यात येणार आहेत.

(४) प्रश्न उद् भवत नाही.

जेष्ठ नागरिक योजना जाहीर केल्याबाबत

(४२) ७३१६३ (१०-०१-२०१७). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जेष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी दि.३० सप्टेंबर, २०१३ रोजी जेष्ठ नागरिक योजना जाहीर केली आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेत कोणकोणत्या बाबींचा समावेश केला आहे,

(३) तसेच सदर योजनेची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. राजकुमार बडोले (२१-०४-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.
(२) ज्येष्ठ नागरीकांना विविध सवलती देण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याचे सर्व समावेशक ज्येष्ठ नागरिक धोरण, २०१३ यास राज्य मंत्रिमंडळाने दिनांक ३०-९-२०१३ रोजी मान्यता दिलेली आहे. यामध्ये पुढील बाबींचा समावेश केला आहे.

अ) वृध्दासाठी अडथळा विरहीत प्रवेशाची तरतूद करणे, या संकल्पोाच विकास करणे, ज्येष्ठ नागरिकांना सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत ओळखपत्र देणे, यासाठी स्वयंसेवी संघटनांची मदत घेणे.

ब) सार्वजनिक रुग्णालयामध्ये वयोवृध्द रुग्ण कक्ष स्थापन करुन स्वतंत्र खिडकीची व्यवस्था करुन स्वतंत्र खिडकीची व्यवस्था करणे, खाजगी संस्थामार्फत वृध्दाश्रमाप्रमाणे विशेष जिल्हा समाज कल्याण समितीस अधिकार देणे, वृध्दाश्रम चालविण्यासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत हेल्पलाईन वृध्दापकाळासाठी प्रकल्प व व्यवसायिक डेकेअर सेंटर कार्यक्रम राबविणे.

क) वृध्दापकाळातील आरोग्य शिक्षण कार्यक्रम राबविणे, बहुविध शिस्त विषयक दृष्टीकोन कायाकल्पचा वापर करणे, फिरत्या वैद्यकीय पथकामार्फत उपचार व सोयीसुविधा देणे, वृध्दासाठी दवाखाना, टपाल कार्यालय, विद्युत व दूरध्वनी भरणा केंद्र, बस रेल्वे आरक्षण यासाठी स्वतंत्र निधी औषधीद्रव्ये, औषधपेढ्या, मोफत उपचार/मानसशास्त्रीय समुपदेशन इत्यादी.
(३) सबंधित विभागाकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

अंधेरी(पूर्व) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भूखंडावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील बालवाड्या व वेल्फेअर सेन्टरचे विकासकाने हॉटेलमध्ये रूपांतर करून विक्री केल्याबाबत

(४३) ७३२१० (१६-१२-२०१६). श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंधेरी (पूर्व) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भूखंडावर सुरु असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील बालवाड्या व वेल्फेअर सेन्टरच्या जागेवर निवासी हॉटेल बनविण्यात आले आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बालवाड्या व वेल्फेअर सेन्टरच्या जागेवर निवासी हॉटेल करण्यास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने परवानगी दिली आहे काय,
(३) असल्यास, सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील रहिवाशांना बालवाड्या व वेल्फेअर सेन्टर या पासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर व विकासकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करणार आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

अंधेरी (पूर्व) येथील मऔवि महामंडळाच्या भूखंडावरील पॉकेट क्र. १० मध्ये येथील पुनर्वसीत इमारत क्र.४ च्या दुस-या मजल्यावर विकासकाने महामंडळाची परवानगी न घेता विनापरवाना हॉटेलचा व्यवसाय सुरु केला आहे.

(२) सदर बालवाड्या व वेल्फेअर सेंटर जागेवर निवासी हॉटेल बांधण्यास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने परवानगी दिलेली नाही.

(३) हे खरे नाही.

पुनर्वसन योजनेखाली ३६ पुनर्वसीत इमारतीचे बांधकाम पुर्ण करुन त्यामध्ये ३४ बालवाड्या, ३० सोसायटी कार्यालय व ८ समाजकल्याण केंद्र अशी एकूण ७२ मुलभूत सुविधांचे वाटप करण्यात आले आहे.

(४) सदर बाबतीत मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम करण्याबाबत व सदनिकाधारकांस मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत महामंडळाच्या दि.२१/१२/२०१५, ८/२/२०१६, १७/३/२०१६, २१/०६/२०१६ व २८/०७/२०१६ अन्वये विकासकास नोटीसा देण्यात आल्या आहेत. तथापि महामंडळाने दिलेल्या नोटीसाच्या अनुषंगाने विकासकाने पहिल्या व तिस-या मजल्यावर मुलभूत सुविधा व दुसऱ्या मजल्यावर विकासकाचे विक्री करावयाचे बांधकाम प्रस्तावित करुन तसा प्रस्ताव मंजूरीकरीता सादर केला आहे. याबाबत महामंडळाच्या स्तरावर पडताळणी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात रब्बी हंगामामध्ये कमी पीक कर्ज वाटप केलेबाबत

(४४) ७३९६९ (२१-०४-२०१७). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने सन-२०१६ सालात रब्बी हंगामामध्ये १३५५८ कोटी रुपयाचे कर्ज वाटप करण्याचे नियोजन केले होते,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी केवळ २४०० कोटी रुपये (१८ टक्के) रब्बी हंगामातील कर्जाचे सहकारी व राष्ट्रीयकृत बँकेच्या माध्यमातून वाटप झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रब्बी हंगामामध्ये पीक कर्जाचे कमी वाटप होण्याची कारणे काय आहेत?

श्री. सुभाष देशमुख (०५-०६-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२) नाही. रब्बी हंगामामध्ये सहकारी व राष्ट्रीयकृत बँकांमार्फत रू.७३११ कोटीचे पीक कर्जाचे वाटप करण्यात आले.

(३) रब्बी हंगामामध्ये पीक कर्जाचे कमी वाटप होण्याची कारणे पुढीलप्रमाणे :-

i) पीक विमा नुकसान भरपाईच्या रकमा शेतकऱ्यांना मिळाल्यामुळे पीक कर्जासाठी मागणी कमी झाली.

ii) काही बँकांना वास्तववादी पीक कर्ज वाटपाचा जास्तीचा लक्षांक देण्यात आल्याने अशा बँकांचे पीक कर्ज वाटप कमी प्रमाणात झाल्याचे दिसून येते.

iii) काही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडे पीक कर्ज वाटपासाठी पुरेसा निधी नसल्यामुळे,
iv) विमुद्रीकरणामुळे बँकांच्या व्यवहारावर काही कालावधीपुरता परीणाम झाल्यामुळे.

सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अपुरी नुकसान भरपाई

(४५) ७४१३४ (२१-०४-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नोटाबंदीमुळे शेती मालाचे भाव घटल्याने डिसेंबर महिन्यात सोयाबीन विक्री करणा-या शेतक-यांना प्रति क्विंटल २०० रुपये अनुदान देण्याची घोषणा शासनाने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,क्विंटलसाठी १००० ते १२०० रुपये नुकसान झालेले असताना फक्त २०० रुपये अनुदान देण्यात येतआहे,हे खरे आहे काय,

(३)असल्यास, हे अनुदान देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुभाष देशमुख (२०-०६-२०१७) : (१) व २) नोटाबंदीमुळे शेती मालाचे भाव घटले, हे खरे नाही. परंतु खरीप हंगाम २०१६-१७ मध्ये राज्यात सोयाबीन पिकाच्या लागवडीखालील क्षेत्रात झालेली वाढ आणि मान्सूनचा समाधानकारक पाऊस यामुळे राज्यात सोयाबीन पिकाच्या उत्पादनात मोठ्याप्रमाणात वाढ झालेली आहे. परिणामी सोयाबीनची बाजारातील आवक वाढून दरात घसरण झालेली होती. यास्तव राज्यातील सोयाबीन शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने शासन निर्णय, दिनांक १० जानेवारी, २०१७ च्या अन्वये राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रति क्विंटल रुपये २०० व अनुदान जास्तीत जास्त प्रति शेतकरी २५ क्विंटल याप्रमाणे जाहिर केलेले आहे.

(३) व (४) पणन संचालक,पुणे यांचेकडून लाभार्थी शेतकरी संख्या व त्यासाठी लागणारे अनुदान याबाबत प्रस्ताव मागविण्यात आला आहे.

गुहागर (जि.रत्नागिरी) व रोहा (जि.रायगड) तालुक्यात प्रस्तावित असलेल्या मेगा रिफायनरी प्रकल्पासाठी स्थळ निश्चित करण्याबाबत

(४६) ७४३२१ (२१-०४-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर (जि.रत्नागिरी) व रोहा (जि.रायगड) तालुक्यात उभारण्यात येणा-या प्रकल्पाबाबत पेट्रोकेमिकल्स लि. इंडियन ऑईल कंपनी लि. व हिंदुस्थान पेट्रोकेमिकल्स लि. यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यामध्ये प्रस्तावित असलेल्या मेगा रिफायनरी प्रकल्पासाठी स्थळ निश्चित

करण्यासंदर्भात मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास बैठक आयोजित करुन सदर प्रकल्पासाठी स्थळ निश्चिती करण्यासंबंधीत कार्यवाही करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रकल्पासाठी जागा निश्चित केली काय,

(३) असल्यास, हे प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) राजापूर (जि.रत्नागिरी) येथे उभारण्यात येणाऱ्या मेगा रिफायनरी प्रकल्पासाठी स्थळ निश्चित करण्यासंदर्भात दिनांक २/९/२०१६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.

(२) होय.

रिफायनरी प्रकल्पासाठी बाबुळवाडी, ता.राजापूर, जि.रत्नागिरी येथील व क्रुड ऑईल टर्मिनलसाठी मौजे गिर्ये, रामेश्वर, जि.सिंधुदुर्ग येथील जागा निश्चित करण्यात आली आहे.

(३) राजापूर औद्योगिक क्षेत्राची व गिर्ये औद्योगिक क्षेत्राची प्रकरण ६ ची अधिसूचना निर्गमित झाली असून प्रकल्प प्राथमिक स्तरावर आहे. तसेच सदर प्रकल्प केंद्र शासनाच्या ऑईल कंपन्यांकडून पूर्ण करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बेंगळुरु-मुबई इकॉनॉमिक कॉरिडॉरमधून कोल्हापूरला वगळण्यात आलेबाबत

(४७) ७६६५० (२१-०४-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेंगळुरू-मुबई इकॉनॉमिक कॉरिडॉरमधून कोल्हापूरला वगळण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कॉरिडॉरमध्ये कोल्हापूरचा समावेश करण्याकरिता सुमारे चार ते पाच हजार एकर जमीन लागणार असून सदर जागा उपलब्ध करून देण्याबाबत मा.उद्योगमंत्री यांनी जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी आणि उद्योजकांनी एकत्र येऊन जागा उपलब्ध करून द्यावी व त्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याच्या सूचना केल्या आहेत, हे ही खरे आह काय,

(३) असल्यास, तद्नुसार सदर प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास, कॉरिडॉरमध्ये कोल्हापूरचा समोवश करण्याबाबतची अंमलबजावणी केव्हापर्यंत होणे अपेक्षित ओह,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत, ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) :(१) हे खरे नाही.

केंद्र शासनाकडून बंगळूर-मुंबई इकॉनॉमिक कॉरिडॉर सुरु करण्याबाबतची कार्यवाही सुरु असून त्याबाबत विविध विकल्पांचा अभ्यास सुरु आहे.

(२) DMICDC या केंद्र सरकारच्या महामंडळाने M/s.Egis India Consulting Engineers Pvt.Ltd.,Bangalore या सल्लागार कंपनीला जागेच्या निवडीसंदर्भात प्रस्ताव देण्यासाठी नियुक्त केले असून सदर सल्लागार कंपनीने जागेबाबतचा अहवाल महामंडळास सादर केला आहे. याबाबतची पुढील कार्यवाही डी.एम.आय.डी.सी.मार्फत करण्यात येणार आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

गडचिरोली जिल्हयातील एमआयडीमध्ये उद्योगधंदे निर्मितीसाठी उद्योजकांना करण्यात आलेल्या भूखंड वाटपाबाबत

(४८) ७८७२५ (२१-०४-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील एमआयडीमध्ये उद्योगधंदे निर्मितीसाठी उद्योजकांना भूखंडाचे वाटप करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू भूखंडावर अद्याप कोणत्याही प्रकारच्या उद्योगाची उभारणी करण्यात आलेली नसल्यामुळे जिल्हयाचा औद्योगिक विकास झाला नसल्याचे नुकतेच माहे जानेवारी,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तद्नुसार याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत, ?

श्री. सुभाष देसाई (१९-०६-२०१७) : (१) होय. हे खरे आहे.

गडचिरोली जिल्हयामध्ये खालील औद्योगिक क्षेत्रात उद्योगधंदे निर्मितीसाठी खालीलप्रमाणे भूखंडांचे वाटप करण्यात आलेले आहे.

१.गडचिरोली-आरेखित-१६६, वाटप केलेले-१४९

२.अहेरी-आरेखित-०३, वाटप केलेले-०३

३.धानोरा-आरेखित-२१, वाटप केलेले-०१

४.कुरखेडा-आरेखित-१४, वाटप केलेले-०३

(२) गडचिरोली जिल्हयामध्ये उद्योग उभारणी करीता भूखंड वाटप करण्यात आलेले असून गडचिरोली येथील ३८ व धानोरा येथील ०१ भूखंडावर उत्पादन सुरु आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

जिल्हा उद्योग केंद्रामार्फत अपेक्षित उद्दीष्ट पूर्ण होत नसल्याबाबत

(४९) ७८९११ (२१-०४-२०१७). ॲड.संजय धोटे (राजूरा), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना पाठबळ व स्वंयरोजगार निर्मीतीसाठी मार्गदर्शन व सहकार्य देणा-या जिल्हा केंद्रामार्फत अपेक्षित उद्दीष्ट पूर्ण होत नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा उद्योग केंद्रामार्फत पंतप्रधान रोजगार निर्मीती कार्यक्रम, जिल्हा उद्योग केंद्र योजना व शेतक-यांसाठी बीज भांडवल योजनेंअतर्गत उद्योग व्यवसायासाठी कर्ज देण्यासाठी जाचक कादगपत्रांची पूर्तता व बँकांच्या उदासिन धोरणामुळे जिल्हा उद्योग केंद्राकडे सुशिक्षित बेरोजगारांकडून प्रतिसाद मिळत नसल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून सदरील योजनांचा लाभ घेण्याकरिता व सुशिक्षीत बेरोजगारांचे उद्दीष्टे वाढविण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय?

श्री. सुभाष देसाई (०९-०६-२०१७) :(१) नाही.

(२) उद्योग संचालनालय यांच्या अधिपत्याखालील जिल्हा उद्योग केंद्रे सर्व जिल्हयाच्या ठिकाणी सन १९७८ पासून अस्तित्वात असून, सदर जिल्हा उद्योग केंद्रामार्फत जिल्हयातील उद्योजकांना उद्योगाबाबतच्या सर्व अडीअडचणी बाबत मार्गदर्शन व केंद्र शासनाच्या तसेच राज्य शासनाच्या उद्योग विकासाच्या योजनांची जिल्हास्तरावर अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना स्वंयरोजगार सुरु करण्यासाठी व त्याद्वारे सुक्ष्म व लघु उद्योगांच्या निर्मितीसाठी, सद्यस्थितीमध्ये जिल्हा उद्योग केंद्रामार्फत सुधारित बीज भांडवल योजना, जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना व पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर योजना कार्यान्वित झाल्यापासून अद्यापपर्यंत लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	योजना	लाभार्थ्यांची संख्या
१.	सु.बी.भां. योजना	४२२२०
२.	जि.उ.कें.कर्ज योजना	५७३६
३.	पं.रो.नि.का	४४१६२

सुधारित बीज भांडवल योजना व जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना बँकांनी मंजूर केलेल्या प्रकल्प किंमतीच्या १५ ते २० टक्के बीज भांडवल मृदू कर्ज स्वरुपात देण्यात येत आहे. सदर योजनांची उद्दीष्टे जिल्हा वार्षिक योजनाअंतर्गत ठरविण्यात येत असून, प्रती वर्षी उद्दीष्टपूर्ती होत आहे. केंद्र शासनाच्या पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत मंजूर प्रकल्प किंमतीच्या १५ ते ३५ टक्के अनुदान देय असल्याने, लाभार्थ्यांचा कल अनुदान योजनांचा लाभ घेण्याकडे जास्त आहे.

सदर योजनांतर्गत शासनांनी विहित केलेली कागदपत्रे घेण्यात येत असून, पंतप्रधान रोजगार निर्मितीची अंमलबजावणी अधिक परिणामकारक होण्यासाठी केंद्र शासनाच्या ऑनलाईन संकेतस्थळावरुन करण्यात येत आहे. सदर योजनांना लाभार्थ्यांचा प्रतिसाद मिळत आहे.

(३) सुधारित बीज भांडवल योजना व जिल्हा उद्योग केंद्र योजनांची उद्दीष्टे जिल्हा वार्षिक योजनाअंतर्गत जिल्हा स्तरावर जिल्हा नियोजन समितीमध्ये ठरविण्यात येतात. तसेच केंद्र शासनाच्या पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत राज्याचे उद्दीष्ट केंद्र शासनाकडून निश्चित करण्यात येते.

(४) लागू नाही.

आधारभूत किंमतीनुसार डाळ खरेदी न केल्यामुळे शेतकऱ्यांचे झालेले आर्थिक नुकसान

(५०) ७९१२० (२१-०४-२०१७). श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.सुरेश लाड (कर्जत), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागिल वर्षाच्या तुलनेत यावर्षी चणा, तूर, मूग, उडीदाचे चांगले उत्पादन होऊनही शासनाने किमान आधारभूत किंमतीनुसार डाळ खरेदी न केल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किमान आधारभूत किंमतीनुसार डाळी खरेदी न केल्यामुळे शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान सहन करावे लागत असल्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच शेतकऱ्यांचे झालेले नुकसान शासन परत देणार आहे काय,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (२०-०६-२०१७) : (१), (२) व (३) हे खरे नाही.

राज्यातील डाळवर्गीय पीक उत्पादक शेतकऱ्यांना, त्यांच्या शेतमालासाठी योग्य भाव मिळावा यासाठी केंद्रशासनाने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमतीनुसार शासनाने मूग व तूरीची खरेदी केलेली आहे.तसेच उडीदाची खुल्या बाजारभावाने खरेदी केलेली आहे. याअंतर्गत झालेली खरेदी पुढीलप्रमाणे आहे:-

मुग -	५२२५/-	६७२७८.४१
सोयाबीन-	२७७५/-	१६४२.९८
उडीद	५०००/- खुल्याबाजार-भावाप्रमाणे	१५३४४७.०७

या व्यतिरिक्त तूरीसाठी राज्यशासनाकडून बाजार हस्तक्षेप योजना राबविण्यात येत आहे.

तुरीची विविध योजनांतर्गत (PSF,MIS, PSS)झालेली खरेदी पुढीलप्रमाणे आहे:-

केंद्रशासन PSF - ४१.५१ लाख क्विंटल

राज्यशासन MIS - ११.७१ लाख क्विंटल

केंद्रशासन PSS - ११.५० लाख क्विंटल

(दिनांक १३/६/२०१७पर्यंत)

चणासाठी चालू वर्षाकरिता किमान आधारभूत किंमत ४०००/- रुपये प्रति क्विटल निश्चित केली आहे. सद्या चणासाठी बाजार भाव रुपये ५०००/-ते ५५००/-च्या दरम्यान असल्याने MSP अंतर्गत खरेदी केलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.